ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 3.8014 (UIF) VOLUME - 6 | ISSUE - 8 | MAY - 2017

REVIEW OF RESEARCH

# संत शेख महंमद : वाड्.मय व सामाजिक जागृती

प्रा.हरिदास शंकर जाधव
विभागप्रमुख , इतिहास व प्रा.भा.इ.संस्कृती व पुरातत्वशास्त्र विभाग,
चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरुर जि.पुणे

## प्रस्तावना :

मध्ययुगीन संत परंपरेतील आपल्या वैशिष्ट्यपूर्ण साहित्यकृती व सामाजिक सुधारणावादी कार्यामुळे शेख महंमद यांना महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. शके १५४८ म्हणजे इ.स. १६२६ साली राजे महंमद व फुलाई या मुसलमान दाम्पत्याच्या पोटी शेख महंमद यांचा जन्म झाला. अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदे (चांभारगोंदे) या गावापासून ८ मैलांवर असलेल्या सई वाहिरे या खेडयात राहणा—या शेख महंमद यांच्या घराण्याकडे तेथील गावची मुलाण्याची (मुलाणा—बारा बलुतेदारांमधील एक बलुतेदार) वृत्ती होती. महंमदबाबा पंधरा—सोळा वर्षांचे असताना वडिलांच्या आज्ञेवरुन बकरे कापण्यासाठी गेले परंतु हातात सुरी घेऊन बक—यापाशी उभे राहिल्यावर त्या गरीब प्राण्याच्या ओरडण्याने त्यांचे कोमल अंत:करण द्रवले. जीवंत शरीराला कापल्यावर कसे दु:ख होते हे पटविण्यासाठी त्यांनी हातातील सुरीने स्वत:चे बोट कापून पाहिले या कृतीमुळे त्यांना परम वेदना झाल्या. थोडेसे बोट कापल्यामुळे इतक्या वेदना होत असतील तर जनावराला काय होत असेल हा विचार त्यांच्या मनात घोळू लागला. अशा प्रकारच्या कृत्याचा त्यांना पश्चाताप झाला. त्याचक्षणी त्यांनी हातातील सुरी भिरकावून दिली व कोणत्याही प्राण्याची हत्या करणार नाही अशी शपथ घेतली.

याच प्रसंगावर शेख महंमद स्वत: आपल्या 'निष्कलंक प्रबोध' या ग्रंथात म्हणतात,

पडताळुनी सु—या पशु विदारिती । रडे बोंबा मारिती कापतां बोट ।
मेल्या रडापोरें रडती परोपरी । नेणती अविचारी परावे दु:ख ।
अहिंसा विज्ञान दु:खी सुख कळले ।
आत्मज्ञान फळले शेख महंमद ।।

वरील प्रसंगाने त्यांना उपरती होऊन ते भगवत् प्राप्तीच्या मार्गास लागले. याच काळात त्यांना चांद बोदले नावाचे गुरु भेटले. संत एकनाथांनी जनार्दन स्वामींबरोबर ज्या चंद्रभटाच्या येथे मुक्काम केला व ज्याच्या तोंडून चतु:श्लोकी भागवताचे कीर्तन ऐकले त्या चंद्रभटास चांद बोधले असे म्हणतात. थोडक्यात शेख महंमदाचे गुरु हे जन्माने ब्राह्मण असले तरी त्यांची गुरु परंपरा सुफी संप्रदायाच्या कादरिया शाखेची आहे. शेख महंमदांनी आपल्या योगसंप्रदाय या ग्रंथाच्या पंधराव्या अध्यायाच्या पहिल्या ओवीतच आपल्या गुरुचा उल्लेख केला आहे.

ओम नमोजी श्रीसद्गुरु चांग बोधले ।
त्यांनी जाणोपंता अंगिकारले ।
जाणोबाने एका उपदेशीलें। दास्यगुणे [१]

चांद बोधल्यांच्या सान्निध्यात परमार्थ वाड्.मयाचे चिंतन—मनन करुन त्यांनी दर्शिविलेल्या वाटेने परमार्थ साधना करुन ते संतपदास पोहचले. मालोजीराजे भोसले व त्यांचे दिवाण बाळाजी कान्हेर हे शेख महंमद बाबांचे शिष्य बनले होते. शके १५९५ साली त्यांनीच श्रीगोंदे येथे मकरंद पेठ नावाची पेठ वसवून तेथे महंमद बाबांना मठ बांधून दिला. श्रीगोंदे येथूनच पुढील काळात शेख महंमदांच्या वाड्.मय निर्मितीचे व



पारमार्थिक विचारांच्या प्रसाराचे कार्य अखेरपर्यंत चालू राहिले.

## शेख महंमदांचे वाड्.मय :

धार्मिक व अध्यात्मिक सेवा–साधना सुरु असतानाच शेख महंमद यांनी इ.स. १६४५ मध्ये योगसंग्राम या ग्रंथाची रचना केली. या प्रमुख ग्रंथाच्या निर्मितीबरोबरच त्यांनी मराठी, हिंदी व फारसी भाषांमध्येही विविध ग्रंथांची रचना केली आहे. या ग्रंथांमध्ये योगसंग्राम –१८ अध्याय व २३१५ ओव्या, पवनविजय– ३ खंड, व ४८२ ओव्या, निष्कलंक प्रबोध –३०० गीतओव्या, रुपके–भारुडे, स्फुट अभंग–२२५ व हिंदुस्थानी कविता इ. साहित्याचा समावेश आहे.

शेख महंमदांच्या साहित्यात योगसंग्राम हा सर्वात महत्वाचा ग्रंथ मानला जातो. श्रावण शु. शके १५६७ सोमवार यादिवशी म्हणजेच इ.स. १५४५ साली या ग्रंथाची रचना झाली. १८ अध्यायात विभागलेल्या २३१५ ओव्यांच्या या ग्रंथात शेख महंमदांनी एक व्यापक पारमार्थिक रुपक योजले आहे. या रुपकाची प्रेरणा त्यांना ज्ञानेश्वरीच्या अध्यायातून प्राप्त झालेली असावी असे डॉ. रा.चिं.ढेरे यांचे मत आहे. ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात (ओवी–४५–५८) योगदुर्गेचे सांग रुपक आलेले आहे. आणि पाचव्या अध्यायात (ओवी–२११–२१७) योगसंग्रामाचे रुपक आहे. [२]

शेख महंमदविरचित योगसंग्रहात आत्मा हा योध्दा आहे. या योद्ध्याने मनाच्या वारुवर आरुढ होऊन अंहकाराशी युध्द मांडले आहे. संकल्प, विकल्प, काम–क्रोध, आळस इ. अवगुणांनी युक्त असे अहंकाराचे सैन्य उभे आहे. या सैन्यावर मात करुन आत्म्याने ब्रह्मांड शिखर गाठले की हा योगसंग्राम संपतो.

शेख महंमद हे कबीराच्या प्रकृतीचे मुक्तचिंतक असल्याने आणि प्रबोधक असल्यामुळे त्यांनी लोकजीवनातील अनिष्ठांचे सूक्ष्म निरिक्षण करुन ती सर्व अनिष्टये विवेकाच्या प्रखर अग्नीत जाळून टाकली आहेत.

धर्माच्या नावावर चालणारे भावहीन कर्मकांड, शुध्द परमात्याशी विसंवादी असणा–या आंधळी क्षुद्र देवताउपासना आणि धर्मक्षेत्रातील दाभिंकता यावर शेख महंमदाचा कटाक्ष आहे. म्हणूनच क्षुद्र देवतांच्या उपासनेवर टीका करताना ते म्हणतात,

तुकाई ना नरसी मायराणी स्मशानी वसती।
भोंगे घालिती गोंधळ।।
अजापुत्रास वधिती भक्त म्हणविती।
पापे करिती तुंबळ।। [३]

शेख महंमदांच्या दृष्टीने क्षुद्र देवतांची उपासना म्हणजे पापांची परिसीमाच. कारण ज्या देवतांच्या प्रसन्नतेसाठी निरपराधी जीवांची हत्या होते, अजाण स्त्रीयांचे जीवन देवदासी बनून व्यभिचारात व्यतीत आणि व्यथित होते ती दैवते पतितांना पावन करणारी नसून पतित करणारी आहेत.[४]

म्हणूनच क्षुद्र देवतांच्या नादी लागलेल्या सर्वसामान्य जनतेची ही कीव करतात. प्रत्येक वाराला तिथीला पूजा–अर्चेचा सोहळा करणा–या समाजाचे धर्मप्रेम किती हास्यास्पद आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे. खंडोबाच्या उपासनेचे भयानकपण सांगताना मुरळयांच्या प्रथेवर तर त्यांनी अक्षरशः आग पाखडल्याचे दिसून येते.

जो नवसे दिवटी हळद मागे । देऊळे करा म्हणोनि भक्तास लागे।
चित्रलेपास नेसविली लुगडी सगे । आपण लेवो नणे ।।
चिता–याकडून करुनिया आपणांस । तो कवी तारील पुजरियास ।
भंडार नाव ठेवून हळदीस । वेडेचार केले ।।
प्रत्यक्ष विटाळाची चिरगुटे । त्यांचे चितारित्राने केले मुखोटे ।
ते पूजिती नेंटे पारे । बाप माझा म्हणूनिया ।।
ज्या मुरळी करिती अनाचार । चालविती उन्मत्तांचे घरचार ।
त्यास म्हणती लावी भांडार । आपलिया हातें ।।
पुण्याचार नये मुरळयांच्या चित्ता । भलत्याच होतील कांता ।
त्याचा हात भाळास लाविता। कोण तरला सांग बा ।।५२।।
जो आपुल्या कुळस्वामीची मुरळी । तिची कैसे खेळती ढवाळी ।

ऐसी कलियुगी प्रभावळी । पापाची वर्ततसे ।।५४।।
मुरळया कुलस्वामीच्या दासी । त्यांसी रमता कंटाळेत ना अपेसी ।
स्वामीही करींना कांही त्यांसी । कां सत्वें सांडवला ।। ५५।।[४]
(योग संग्राम –१४–५२,५४,५५)

शेख महंमद बाबांनी खंडोबाचे केलेले वर्णन आणि त्यांनी मुरळयांच्या प्रथेविषयी व्यक्त केलेला राग संतभुमिकेतून योग्यच वाटतो. परंतु ते सर्वच सगुणोपासनेचा निषेध करतात असे मात्र नाही. त्यांचा रोख आहे मुख्यत: अज्ञान व दंभ यावर. अज्ञानावर ज्ञानाचा प्रकाशझोत टाकणे, दंभ व दाभिंकाचे बुरखे ओढणे यावरच त्यांचा भर आहे. सामाजिक जागृती व सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने शेख महंमद यांचे हे विचार आजही महत्वाचे व तितकेच गरजेचे आहेत.

## संदर्भ व तळटीपा:

१. रा.चि.ढेरे, (संपा.) **शेख महंमद विरचीत योगसंग्राम,** पुणे, १९६६, पृ. १३३
२. कित्ता., पृ. ६.
३. शेख महंमदकृत कवितासंग्रह, पृ.१०९
४. रा.चि.ढेरे, **लोकधर्मीय दैवते,** पृ. २३
५. रा.चि.ढेरे, उपरोक्त, अध्याय, १४, ओवी ५२–५४